दैनिक जनसामान्यांचे शस्त्र
# मराठवाडा पत्र
संमिश्र
बुधवार, दि. २५ सप्टेंबर २०२४
पान ३

## थोडक्यात

### जय शिवसंग्रामच्या पिंपळनेर सर्कल प्रमुखपदी पिनुराजे डांगे यांची निवड

पिंपळनेर । प्रतिनिधी



जय शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष रामहरी भैया यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ मोरे यांच्या आदेशावरून पिंपळनेर सर्कल प्रमुख पदी पिंपळनेरचे युवा नेते पिनू राजे डांगे यांची निवड झाल्याबद्दल पिंपळनेर सर्कल मध्ये आनंद उत्सव साजरा करण्यात आला. या निवडीमुळे पिंपळनेर सर्कल मध्ये जय शिवसंग्राम ची ताकद आणखी वाढणार असून पिनु डांगे हा युवक सर्वसामान्य माणसाच्या मदतीला धावून येणारा आहे ,कुणाचे सुखदुःख असो व कोणाच्या अडीअडचणी असो सर्व जाती धर्मातील लोकांना पिनो डांगे हा नेहमीच आपला माणूस असल्याचे जाणवते सर्वसामान्यांचे अडीअडचणी धावून जाणारा माणूस म्हणून पिनू डांगे पिंपळनेर परिसरात परिचित आहे रामहरी भैया मेटे यांनी पिनु राजे यांच्यावर दाखवलेला विश्वास आणि दिलेल्या संधीचे नक्कीच सोन करिता पिंपळनेर परिसरात जय शिवसंग्राम घराघरात पोहोचविण्याचे काम करणार असल्याचे पिनू राजे डांगे यांनी म्हटले आहे.

### पोलिस असल्याचे सांगून कारमध्ये लिफ्ट मागितली; नंतर बंदुकीच्या धाकावर लुटले

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

मैत्रिणीसोबत जेवण करण्यासाठी गेलेल्या तरुणाला पोलिस असल्याचे सांगून लिफ्ट मागितली. कारमध्ये बसताच डोक्याला पिस्तूल लावून लुटले. ही घटना शनिवारी रात्री १० वाजता लिंक रोडवर घडली. याप्रकरणी रविवारी सातारा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सिंधी कॉलनीत राहणारा ध्रुव जैन (२२) शनिवारी रात्री ९ वाजता मैत्रिणीसोबत कारने फिरण्यासाठी गेला होता. त्याच परिसरात जेवण करून तो लिंक रोडने गोलवाडी शिवारातून पैठण रोडच्या दिशेने जात असताना गाडीच्या समोर अचानक एक तरुण आडवा उभा राहिला. 'मी पोलिस आहे, मला पुढे गावात सोडून मदत करा', अशी विनंती त्याने केली. ध्रुवला त्याच्यावर विश्वास बसला. कारच्या मागच्या सीटवर बसल्यावर त्याने माझे गाव पुढे आहे, असे सांगत वळदगाव शिवारात घेऊन गेला. निर्मनुष्य परिसरात जाताच थेट पिस्तूल लावली. या प्रकारामुळे ध्रुव व त्याची मैत्रिणी पुरते घाबरून गेले. दोघांनी घरी जाऊन हा प्रकार सांगितला. त्यानंतर रविवारी ध्रुवने सातारा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. निरीक्षक संग्राम ताटे यांनी गुन्हा दाखल केला. उपनिरीक्षक नंदकुमार भंडारे तपास करत आहेत. वळदगाव शिवारातून अंधारात नेत त्याने गाडी थांबविण्यास सांगितले. तेथे त्यांच्या अंगावरील दागिन्यांसह रोख रक्कमेची मागणी केली. ध्रुवने त्याच्या हातातील ६ ग्रॅमच्या सोन्याच्या २ अंगठ्या, मैत्रिणीच्या गळ्यातील ८ ग्रॅमची सोनसाखळी व ४ हजार रुपये रोख रक्कम हिसकावून अंधारात पसार झाला.

### कोल्हापूर ते अहमदाबाद गुजरात २७ ऑक्टोबरपासून थेट विमानसेवा, उत्तर भारताशी कोल्हापूर जोडले जाणार

कोल्हापूर । प्रतिनिधी

कोल्हापूर आणि गुजरातचे व्यापारी संबंध असल्याने कोल्हापूरहून अहमदाबादला नियमितपणे ये-जा करणाऱ्या ग्राहकांची संख्या लक्षणीय आहे. त्यामुळे २७ ऑक्टोबर पासून कोल्हापूर-अहमदाबाद गुजरात नियमित विमानसेवा सुरू होणार आहे. सोम वार, गुरूवार, शुक्रवार आणि शनिवारी ही सेवा सुरू राहणार असून कोल्हापूरहून सकाळी ११ वाजता विमान उड्डाण करेल आणि १२ वाजून २० मिनिटांनी अहमदाबादला पोहोचेल अशी माहिती खासदार धनंजय महाडिक यांनी मंगळवारी दिली. कोल्हापूरच्या विमानसेवेचा गतीने विस्तार होत असून कोल्हापूर- तिरूपती विमान सेवा सुरू झाली आहे. नागपूर, गोवा तसेच दिल्ली मार्गावर थेट विमानसेवा सुरू होण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. आता कोल्हापूरकरांची म ागणी असलेली कोल्हापूर ते अहमदाबाद गुजरात थेट विमानसेवा २७ ऑक्टोबरपासून सुरू होत आहे. स्टार एअर लाईन कंपनीचे सुमारे ५० आसन क्षमतेचे विमान, कोल्हापूर-अहमदाबाद-कोल्हापूर या मार्गावर उड्डाण करेल. खासदार धनंजय महाडिक यांनी यासाठी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.




बीड बसस्थानकाची दुरवस्था सगळीकडे चिखलाचे साम्राज्य प्रवाश्यांना नाहक त्रास; प्रशासन याकडे लक्ष कधी देणार?

## आंदोलनाची दिशा समाजाच्या लक्षात यावी यासाठी आदर्श देवगाव मधून साखळी उपोषण

### एसटी आरक्षणाची अंमलबजावणी हाच खरा धनगर समाज बांधवांचा लढा

वडवणी । प्रतिनिधी

धनगर बांधवांनी संभ्रमात न राहता एस टी आरक्षणाच्या पाठीम ागे ठाम राहावे, यातूनच समाजाला न्याय मिळेल ओबीसी बचाव मध्ये धनगर बांधवांचा वापर होतोय ,यातून समाजाला न्याय मिळणार नाही.

धनगर जमातीचा पूर्वी पासून लढा हा एस टी आरक्षणाची अंमलबजावणी हाच असून सम ाजामध्ये संभ्रम अवस्था निर्माण करण्याचे काम समाजातील काही लोक करत आहेत, त्यामुळे धनगर बांधवांचे खरे आंदोलन हे पंढरपूर येथील आहे, त्याच आंदोलनाला वाडी, वस्ती, शेतावर, माळरानावर ,राहणाऱ्या मेंढपाळ बांधवांचा पाठिंबा आहे,त्यामुळे संबंध धनगर बांधवांनी ओबोसी बचाव हे आंदोलन धनगर बांधवांचे नसून पंढरपूर येथील आंदोलन एस टी आरक्षण अंमलबजावणी यावर फोकस करणे गरजेचे आहे. त्याम ुळे च आंदोलनाची खरी दिशा बांधवांना लक्षात यावी यासाठी वडवणी तालुक्यातून साखळी उपोषणाची सुरुवात करण्यात येत आहे यावेळी उपोषणास बसलेले देवगाव येथील समाज बांधव,, आता राज्यातील ग्रामीण भागामध्ये धनगर समाजाच्या एसटी आरक्षण साठी आता गावागावात साखळी उपोषण सुरू आहेत तरी बीड जिल्ह्यातील सर्व गावातील धनगर समाज बांधवांनी पंढरपूर येथील एसटी आरक्षण अंमलबजावणी साठीच्या आंदोलनाला पाठिंबा




देण्यासाठी प्रत्येक गावातून साखळी उपोषणाची सुरुवात करावी उपोषण करत असताना सर्व समाज बांधवांना गावातील सर्व जाती-धर्मातील लोकांना सोबत घ्यावे जातीय तीळ निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी गावातील वातावरणात सलोखा राहील याची काळजी घ्यावी आंदोलनाला कसल्याही प्रकारचे हिंसक वळण लागु देऊ नये कारण प्रत्येक वेळी आनंदाचे व संकटाच्या वेळी गाव गडातील माणूसच आपल्या मदतीला येत असतो आपल्या सुखदुःखात सहभागी होत असतो त्यामुळे सर्वांच्या भावनांचा अनादर होईल असे वातावरण होऊ देऊ नये असे आवाहन सकल धनगर बांधवांच्या वतीने करण्यात येत आहे तरी महाराष्ट्रातील सत्ताधारी व विरोधी विधानपरिषदेचे सर्व सदस्य व मंत्रिमंडळ यांनी धनगर बांधवांच्या भावनांची कदर करून ७५ वर्षापासून लढत असलेल्या लढ्याचा विचार करता सहानुभूतीपूर्वक एसटी आरक्षणाची तात्काळ अंमलबजावणी करावी सत्यादाराबद्दल धनगर बांधवांच्या मनात निजामी राजवटीपेक्षा जुलमी राजवट राज्यकर्त्यांची दिसून येत असून आता वेळ न दवडता पंढरपूर येथील आंदोलकांचा विचार करता व संबंध महाराष्ट्रातील धनगर समाज बांधवांना आरक्षणाची अंमलबजावणी करावी अशी मागणी होत आहे.



गौरव कर्तृत्वाचा :श्री.जाहेर रहेमान शेख यांना इनरव्हील क्लब ऑफ कोल्हापूर सनराईज चा आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

### बीड जिह्याच्या शिक्षकांने जिल्ह्याची मान उंचावली : डॉ.अनिता दहिफळकर

बीड । प्रतिनिधी

समाजात निस्वार्थ भावनेने व निष्ठेने सेवा करणाऱ्या व शैक्षणिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय आणि उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांचा दरवर्षीप्रमाणे याही वर्षी ईनरव्हील क्लब ऑफ कोल्हापूर सनराईजचा आदर्श शिक्षक पुरस्कार श्री. जाहेर रहेमान शेख यांना पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला . सतत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास , शाळेत राबवलेले विविध उपक्रम तसेच शाळेच्या प्रगतीसाठी आणि विध्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी तसेच त्यांनी विशेष म्हणजे नवोदय, स्कॉलरशिप साठी ही बरेच विध्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. त्यांनी स्वतः ला झोकून देऊन केलेले कार्य याची दखल घेऊन शिक्षक श्री.जाहेर शेख अ यांना इनरव्हील क्लब ऑफ कोल्हापूर सनराईज चा आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. यामुळे बीड जिल्ह्यातील दहिफळ वडमावली गावचा शिक्षक कोल्हापूर येथे राहून आपल्या जिल्ह्याची मान उंचावली असल्याचे दहिफळ गावचे सरपंच डॉ अनिता दहिफळकर यांनी शुभेच्छा संदेशात म्हटले आहे.दहिफळ वडमाऊलीचे सर्व गावकऱ्यांनी शुभेच्छा देऊन आनंद व्यक्त केला.




*डिजिटल मीडियाच्या प्रदेअध्यापदी डोगरचा राजाचे संपादक अनिलजी वाघमारे साहेब व जितेंद्रजी शिरसाट सर यांची राज्य कार्यकारणी सदस्य पदी निवड झाल्याबद्दल पिंपरी चिंचवड येथे भेटुन शुभेच्छा देताना... मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष विनायक जाधव, पत्रकार शांतीलाल जैन,पत्रकार सतिश मुजमुले, पत्रकार संभाजी लांडे, पत्रकार अशोक फपाळ, पत्रकार अर्जुन मुंडे, पत्रकार गीतांजली लव्हाळे मॅडम अदी उपस्थित होते.*

## शेतामधील विहिरीत पोहताना पाण्यात बुडून अल्पवयीन तरुणीचा दुर्दैवी मृत्यू

बीड । प्रतिनिधी

बीडमधून एक मन हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. यामध्ये स्वतःच्या शेतातील विहिरीत पोहताना एका १३ वर्षीय मुलीला पाण्यात बुडाल्याने आपला जीव गमवावा लागला आहे. ही दुर्दैवी घटना अंबाजोगाई शहरालगत असणाऱ्या चनई परिसरात घडली आहे.

काय घडले नेमके?

कल्याणी कानोबा गोचडे असे मृत पावलेल्या अल्पवयीन तरुणीचे नाव आहे. मृत कल्याणी ही सातवीच्या वर्गात शिक्षण घेत होती. तिला चांगलं पोहता येत होतं. त्यामुळं ती स्वतःच्या शेतातील विहिरीत पोहण्यासाठी उतरली. मात्र, पोहताना तिला धाप लागल्याने ती पाण्यात बुडाली. यावेळी विहिरीच्या काठावर असलेल्या तिच्या भावासह चुलत्याने तिला पाण्यातून काढण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. मात्र त्याचा काहीच उपयोग झाला नाही. अखेर कल्याणीचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच गावकऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. अथक प्रयत्नानंतर कल्याणीचा मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात आला. या घटनेमुळे संपूर्ण गावात हळहळ व्यक्त केली जात आहे. याप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एस. जगताप, दिवाणी न्यायाधिश क. स्तर, शिरुर का. यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं.२०८ / २०२४**
**विठ्ठल विरुध्द निल**
**ॲड. एच. एस. कोठुळे यांच्या मार्फत**

अर्जदार :- विठ्ठल पि. भाणुदास चव्हाण वय ५९ वर्षे, धंदा शेती, रा. जाटनांदुर, ता. शिरुर का., जि. बीड मो. नं. ९७३०३९५५००.

विरुध्द
निल

**अर्ज – बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत....**

ज्यापेक्षा मयत नामे **सोजरबाई भ्र. भिमराव जेधे, रा. सवसवाडी तहत जाटनांदुर, ता. शिरुर का., जि. बीड, यांचा मृत्यु दिनांक दि. ३०/०३/२०२४ रोजी** जिल्हा रुग्णालय, अहमदनगर, येथे मयत झाले असुन अर्जदार हा मयताचा सख्खा भाऊ आहे. तसेच अर्जदार हा मयताचा कायदेशीर वारस आहे, असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हा उपरोक्त मयताचा वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार ह्यांचे हक्का बद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयत यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ०४/०९/२०२४ रोजी माझ्या सहिने न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख -१५/१०/२०२४

**आदेशावरून.**
(स्वाक्षरीत)
सहा. अधीक्षक
दिवाणी न्यायालय, क.स्तर, शिरूर का.,

शिक्का

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

### पुणे विमानतळाचे नाव बदलण्याचा प्रस्ताव मंजूर; जगद्गुरू संत तुकाराम महाराज विमानतळ हे नाव

पुणे । प्रतिनिधी


पुणे विमानतळाचे नामकरण जगद्गुरू संत तुकाराम महाराज पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळ असे करण्याच्या प्रस्तावाला महाराष्ट्र सरकारने अधिकृत मान्यता दिली आहे. सोमवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून तो अंतिम मंजुरीसाठी केंद्र सरकारकडे पाठवण्यात येणार आहे.

केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी मांडलेल्या या प्रस्तावाचा उद्देश पुणे जिल्ह्यात जन्मलेल्या भक्ती चळवळीतील आदरणीय संत आणि अध्यात्मिक कवी संत तुकाराम यांच्या वारशाचा सन्मान करणे हा आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म द वर कृतज्ञता व्यक्त करताना, मोहोळ यांनी भाजप , मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस या सत्ताधारी महायुती आघाडीचे आभार मानले .

## हरणाच्या पाडसाचे कुत्र्याच्या तावडीतून प्राण वाचवले; वनविभागाकडे सुपुर्त केले

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील शिवम कल्याण कोकाटे यांच्या शेतात सोयाबीन काढत असताना हरणाच्या पाडसावर रानातील कुत्र्यांनी हल्ला केला असता कल्याण कोकाटे आणि त्यांच्या कुटुंबीयांनी याची फोनवरून डॉ. गणेश ढवळे आणि पत्रकार हरीओम क्षीरसागर यांना कल्पना दिली. आम्ही दोघांनी पावसाने झालेल्या चिखलामुळे मोटार सायकल जात नसल्याने एक किलोमीटर चिखलातून जाऊन पाडसाला ताब्यात घेऊन बीड वनपरिक्षेत्र अधिकारी काकडे यांना फोन वरून कल्पना दिली. त्यांनी वनपाल अंगद बहिरवाळ यांना फोन वरून पाडसाला ताब्यात घेण्यास सांगितले.वनपाल अंगद बहिरवाळ यांच्या सांगण्यावरून वनविभागातील कर्मचारी अनिल शेळके, मधुकर वायभट, हनुमंत वायभट हे लिंबागणेश येथे डॉ. गणेश ढवळेंच्या घरी सायं ८ वाजता पोहोचले.अगोदरच भेदरलेल्या पाडसाला डॉ.गणेश ढवळे यांनी घरी आणुन पाणी पाजले.त्यानंतर वनविभागाचे कर्मचा-यांना सुपुर्त करण्यात आले. यावेळी पत्रकार हरीओम क्षीरसागर,गणपत तागड, कल्याणबापु वाणी , बालासाहेब जाधव उपस्थित होते.



## स्व.विनायकराव मेटे यांच्य योगदानाची घेतली दखल महायुती सरकारचे मनःपूर्वक आभार: रामहरी मेटे

बीड । प्रतिनिधी

दिवंगत लोकनेते विनायकराव मेटे यांनी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सक्रिय राहून सातत्याने लोकांच्या हिताची कामे केली. मराठा आरक्षण लढा व विद्यार्थ्यांसाठी आंदोलन उभा करून न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्यांची राजकीय सक्रियता आणि प्रभावामुळे बीड जिल्ह्याच्या विकासात भर पडली. त्यांच्या जाण्याने राज्यातील राजकारणात पोकळी निर्माण झाली. परंतु त्यांचे समाजकार्य त्यांचे योगदानाची दखल दखल घेतली. बीड आयटीआयच्या लोकनेते विनाकाराव मेटे यांचे नाव देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला.

याबद्दल महायुती सरकारचे मनःपूर्वक आभार जय शिवसंग्रा अध्यक्ष रामहरी मेटे यांनी व्यक्त केले आहे. काल राज्य मंत्रिमंडळाची बैठक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात पार पडली. या बैठकीत काही महत्वाचा निर्णय घेण्यात आलेराज्यातील विविध जिल्ह्यात असलेल्या १४ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था म्हणजे आयटीआय



यांचे नामांतर करण्याचा निर्णयही झाला . शासनाने १४ आयटीआय यांचे नामांतर करुन १४ महान व्यक्तींची नावेदेखील या आयटीआय संस्थेसाठी जाहीर केले.या निर्णयानुसार बीडमधील आयटीआयला दिवंगत नेते विनायक मेटे यांचं नाव देण्यात आलं आहे.

या निर्णयामुळे दिवंगत नेते विनायकराव मेटे यांच्या कार्याचा गौरव झाला. त्यांचे काम आणि नाव भावी पिढीच्या चिरंतर स्मरणात राहील. जिल्ह्यातील जनतेला याचा आनंद झाला असून सर्व स्तरातून या निर्णयाचे स्वागत होत आहे. पुन्हा एकदा जय शिवसेना संघटनेच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस मा. उपमुख्यमंत्री अजित दादा पवार आणि म हायुती सरकारमधील घटक पक्षाचे आभार व्यक्त करतो.

जनसामान्यांचे शस्त्र, दैनिक

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

● बुधवार, दि.२५ सप्टेंबर २०२४ ● पान ४


# पाटलांची तब्येत खालावली; महिलांचा आक्रोश

● मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या
सगेसोयरेच्या अधिसूचनेची अंमलबजावणी करावी.
हैदराबाद गॅझेट लागू करावे. सातारा गॅझेट लागू करावे.
बॉम्बे गव्हर्नमेंट गॅझेट लागू करावे.
मराठा बांधवांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे सरसकट मागे घ्यावेत.





**जालना । प्रतिनिधी**

येथील अंतरवाली सराटीमध्ये मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा सहाव्यांदा उपोषण सुरु केले आहे. सगेसोयरे अधिसूचनेची अंमलबजावणी तसेच हैदराबाद सातारा आणि बॉम्बे गव्हर्मेंटचे गॅझेट लागू करावे यासह मराठा आंदोलकावरील आंदोलनादरम्यान दाखल झालेले गुन्हे मागे घ्यावेत, या मागणीसाठी ते आठ दिवसांपासून उपोषणाला बसले आहेत. त्यामुळे आता मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती खालावली आहे. मनोज जरांगे यांच्या आमरण उपोषणाच्या पाचव्या दिवशी त्यांची प्रकृती खालावली होती. यानंतर लोकांनी त्यांना उपचार घेण्याची विनंती केली होती. मंत्री शंभूराज देसाई यांनी देखील मनोज जरांगे यांना फोन करुन उपचार घेण्याची विनंती केली होती. त्यानंतर मनोज जरांगे यांनी उपचार घेतले होते. मनोज जरांगे यांना डॉक्टरांकडून सलाईन लावण्यात आले होते.

दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणच्या चौथ्या दिवशी मनोज जरांगे यांच्या तपासणीसाठी डॉक्टरांचं पथक आलं होतं. यावेळी जरांगेंनी डॉक्टरांना चांगलेच झापले होते. माझं शुगर उपोषणाला बसताना ७१ होतं मग शुगर ८५ कसं झालं, असा सवाल जरांगेंनी उपस्थित केला होता. तुम्ही फडणवीसांना मॅनेज झाल्याचा आरोप जरांगे यांनी डॉक्टरांवर केला होता.



## प्रवाशांच्या सेवेत ई-बस सेवा सुरू
## बीड जिल्ह्यात २३ नवीन बसेस प्राप्त

### बीड ते संभाजीनगर बससेवेचा मान्यवरांच्या हस्ते शुभारंभ

**बीड । प्रतिनिधी**

अत्याधुनिक क्षेत्रात अत्याधुनिक सुविधा दिवसेंदिवस मिळत आहेत. लालपरीसुद्धा आता अत्याधुनिक होत आहेत. प्रदुषण कमी करण्यासाठी वाहन मोटारीमध्ये अनेक बदल होवू लागले आहेत. यामध्ये आता एसटी बसेससुद्धा इलेक्ट्रॉनिक स्वरूपात येत आहेत. बीड जिल्ह्यामध्ये २३ ई-बस प्राप्त झाल्या असून आज बीड ते संभाजीनगर या महामार्गावर ई-बस सेवेची सुरुवात करण्यात आली.

यावेळी संभाजीनगर प्रदेशाचे प्रादेशिक अभियंता अशोक



पन्हाळकर, बीड विभागाचे विभागनियंत्रक श्रीमती अनुजा दुसाणे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात आला. यावेळी बीड विभागातील सर्व अधिकारी, बीड आगाराचे आगारप्रमुख सतिष तिडके, सर्व पर्यवेक्षकीय कर्मचारी-चालक-वाहक यांची प्रमुख उपस्थिती होती. लाल परीत मोठ्या प्रमाणात बदल होवू लागले आहेत. पूर्वीच्या लालपरीत व आताच्या लालपरीत खुप मोठी तफावत आहे. बस महामंडळात पूर्वी पाहिले तर डबक्या डुबक्या

● ९ मिटर लांबीची बस, ३५ प्रवाशांची क्षमता
एकवेळच्या चार्जींगमध्ये २०० कि.मी.धावणार
लवकरच बीड ते केज, बीड ते माजलगाव, बीड ते शिरूर याठिकाणीही बससेवा सुरू होणार

▶▶उर्वरित पान २ वर

### भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ
## सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची भेट घेऊन मानले आभार!



**मुंबई । प्रतिनिधी**

ब्राह्मण समाजाला स्वतंत्र भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून ५० कोटीचा भरभरून निधीही उपलब्ध करून दिल्याबद्दल राज्य सरकारचे आभार व्यक्त करण्यात येत आहेत. या अनुषंगाने राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची भेट घेऊन सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने आज आभार व्यक्त करण्यात आले.

महायुती सरकारने काल पार पडलेल्या कॅबिनेट बैठकीत ब्राह्मण समाजासाठी स्वतंत्र भगवान परशुराम आर्थिक महामंडळ स्थापन केले.अनेक दिवसांपासून जिव्हाळ्याचा प्रश्न शासनाने मार्गी लावला. ▶▶उर्वरित पान २ वर

## भीमाशंकर याची वयाच्या २४ व्या वर्षी मुत्यूशी झुंज

### ● गावकऱ्यांनो भीमाशंकर वाचला पाहिजे..



**माजलगाव । प्रतिनिधी**

मानवता सिध्द होताना नियती त्याचा जिवंत दाखला माघत असते, असाच एक पेचप्रसंग वारोळा टाकरवण ता. माजलगाव येथील मस्के कुटुंबासमोर उभा राहिला आहे, वारोळा येथील गरीब कुंबातील महारुद्र मस्के यांचा २४ वर्षीय मुलगा भीमाशंकर ह्याला माघील १० तारखेला श्वास घेण्यास त्रास होऊ लागल्याने पुणे येथील प्रायव्हेट हॉस्पिटल मध्ये उपचार सुरू केले होते सदर उपचारात

**गावकऱ्यांनो आपला लेक वाचवा : सरपंच शरद पवार**

२४ वर्षीय भीमाशंकर आपल्या गावाचा लेक आहे,आपल्याला त्याला या जीवघेण्या संकटातून सुखरूप बाहेर काढायचे आहे त्याकरिता लागणारा खर्च मोठा आहे. आपली छोटीशी मदत भिमाचा जीव वाचू शकते. चला तर मग खालील नंबर वर मदत करून आपलं दायित्व सिद्ध करू असे आवाहन सरपंच शरद पवार यांनी केले आहे. येथे मदत करा - फोन पे ९३०९८४५१५२ (भीमाशंकर महारुद्र मस्के)

४०ते ५० हजार रुपयाचा खर्च लागला मात्र निधन होत न्हवते सदर हॉस्पिटल ने पुणे येथील ससून हॉस्पिटलमध्ये रेफर केले असता .

मारफान सिंड्रोम ( चक्ष्ड ) हा एक बहु-सिस्टिमिक अनुवांशिक विकार आहे गंभीर गुंतागुंतांमध्ये हृदय आणि महाधमनी यांचा समावेश होतो , ज्यामध्ये मिट्रल व्हॉल्व्ह प्रोलॅप्स आणि महाधमनी धमनीविकाराचा धोका वाढला आहे ह्या जीवघेण्या निष्पन्न झाल्याने या आजाराची लवकर ▶▶उर्वरित पान २ वर

## गणेश मंडळांनी अंबाजोगाईची सांस्कृतिक परंपरा जोपासली: आ.नमिता मुंदडा

### ● गणेशोत्सवातील मिरवणूक, आरास व महालक्ष्मी आरास देखावा स्पर्धेचे बक्षीस वितरण




**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

गणेश मंडळाच्या माध्यमातून अंबाजोगाईची सांस्कृतिक परंपरा जोपासण्याचे काम अनेक गणेश मंडळांनी केले. समाज प्रबोधनाचा वारसा याला कलाकृतीची जोड देवून शहरात उत्कृष्ट देवाव्याची परंपरा शहरवासीयांनी जोपासली असे प्रतिपादन केज विधानसभेच्या भाजपाच्या आमदार नमिता अक्षय मुंदडा यांनी केले.

वसुंधरा सेवा प्रतिष्ठाण व रोटरी क्लब यांच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त घेण्यात आलेल्या मिरवणूक देखावा आरास व महालक्ष्मी देखावा आरास या स्पर्धेचे बक्षीस वितरण आ.नमिता मुंदडा यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. या बक्षीस वितरण समारंभ प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर ज्ञानप्रबोधनिचे समन्वयक प्रसाद चिक्षे, रोटरी क्लबचे अध्यक्ष कल्याण काळे, रोटरी क्लबचे प्रकल्प संचालक शेख शकील बागवान, अभिजीत जोंधळे, प्रा.संतोष मोहिते, सुदर्शन रापतवार, राजेसाहेब किर्दंत, प्रा.डॉ.मुकुंद राजपंखे, पंजाबराव थारकर, रमण सोनवळकर, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा यांची उपस्थिती होती. ▶▶उर्वरित पान २ वर

**▶ यांना मिळाली पारितोषिके**

गणेश देवाखा आरास स्पर्धा - सरस्वती गणेश मंडळ (प्रथम क्रमांक), हनुमान सांस्कृतिक गणेश मंडळ (द्वितीय), दिपक गणेश मंडळ (तृतीय), ज्ञानप्रबोधिनी गणेश मंडळ (चतुर्थ), योगेश्वरी गणेश मंडळ (पाचवे), श्रीदत्त मंदिर, हौसिंग सोसायटी (उत्तेजनार्थ).

**▶ मिरवणूक स्पर्धा**

ज्ञानप्रबोधिनी गणेश मंडळ (प्रथम), नगरसंघ गणेश मंडळ (द्वितीय), संगम गणेश मंडळ (तृतीय), हनुमान सांस्कृतिक गणेश मंडळ (चतुर्थ), महाराष्ट्र सांस्कृतिक गणेश मंडळ (पाचवे), उदय गणेश मंडळ (उत्तेजनार्थ)

**▶ महालक्ष्मी आरास स्पर्धा**

आशा लोमटे (प्रथम), आघाव (द्वितीय), आकांक्षा कडबाने (तृतीय), तर उत्तेजनार्थ ललीता टेकाळे, आरती कदम, डॉ.कुंडगे यांना देण्यात आले.

# राज्यात प्रथमच बाल दिव्यांग महोत्सव

### बीडमधून 5 ऑक्टोबरला शुभारंभ; बालरंगभूमी परिषदेचा स्तुत्य उपक्रम

**बीड । प्रतिनिधी**

येथील अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची घटक संस्था बालरंगभूमी परिषद प्रत्येक जिल्हास्तरावर दिव्यांग महोत्सव घेणार आहे. ५ ऑक्टोबरला बीड दिव्यांग महोत्सवापासून याची सुरूवात होणार असल्याची माहिती बीड शाखेच्या अध्यक्ष तथा बालरंगभूमी परिषदेच्या उपाध्यक्ष प्राचार्य डॉ.दीपाताई क्षीरसागर यांनी दिली आहे.

बालरंगभूमी परिषद आपल्या



व्याप्तीनुसार मुलांच्या सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक उन्नतीसाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने कार्य करत असताना विशेष मुलांना सुध्दा व्यासपीठ उपलब्ध व्हावे. त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव, प्रोत्साहन देवून त्यांना सक्षम मुलांच्या प्रवाहात आणण्यासाठी 'यहाँ के हम सिंकदर' हा विशेष मुलांच्या कलागुण सादरीकरणाचा एक प्रयत्न आहे. शहरातील सौ.के. एस.के. महाविद्यालयाच्या परिसरात दि.५ ऑक्टोबर रोजी सकाळपासून सुरू होणार्या महोत्सवात बीड जिल्ह्यातील जवळपास २५ दिव्यांग शाळांचा सहभाग असणार आहे. यात कर्णबधीर, मुकबधीर, अंध, मतिमंद, अस्थिव्यंग अशा अनुदानित, विनाअनुदानीत शाळांचा सहभाग घेता येणार आहे. अंदाजे २०० विद्यार्थी सहभागी होतील. विशेष मुलांच्या गुण ▶▶उर्वरित पान २ वर

**नोंदणी, अधिक माहितीसाठी संपर्क साधावा**

नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्कासाठी विजय राख ९८३३३४५८०९, दिपक जमधाडे ८८८८८५०३५८, नामदेव साळूंके ८३०८३६३३३५, सुरेश थोरात ९४२२९११०९०, मिलींद शिवणीकर ९४२२९३०४९०, अमित गाडे ८८८८९५९७९२, प्रदिप भोकरे ९८२२५९९६९७, अक्षय फुलझळके ९६३७९९९६२९, सुरेश साळूंके ९८२३६०१४८० यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### माधवराव पांडे यांचे निधन

**बीड । प्रतिनिधी**



शहरातील ज्ञानेश्वरनगर, आय टी आयच्या पाठीमागे राहत असलेले महा वितरणचे सेवानिवृत्त अभियंता माधव बळवंतराव पांडे (६८) यांचे अल्पशः आजाराने मंगळवारी पहाटे निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर पुणे येथे उपचार सुरू होते.मंगळवारी दुपारी बीड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी,सुना,नातवंडे असा परिवार आहे.

**थोडक्यात**

### शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था बीड येथे प्रशिक्षण मेळावा

**बीड । प्रतिनिधी**

शासनाने राज्यातील १२ पदविका, पदवी, आयटीआय उत्तीर्ण तरुणांना कार्य प्रशिक्षण अनुभव मिळण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य व शिक्षण योजना जाहीर केली असून कार्य प्रशिक्षण हे ६ महिने कालावधीसाठी असणार आहे. कार्य प्रशिक्षण कालावधीत उमेदवारांना १२ पास ६ हजार रुपये आयटीआय किंवा पदविका फॉर्म ८ हजार रुपये तर पदवी किंवा पदवीव्युत्तर उमेदवारांना १० हजार रुपये मानधन असणार आहे. कार्य प्रशिक्षणानंतर उमेदवारास प्रमाणपत्रही दिले जाणार आहेत. सदर योजनेअंतर्गत मोठ्या संख्येने युवक सहभागी होत असून बीड परिसरातील उमेदवारांना योजनेचा लाभ होण्यासाठी संस्थेने मुख्यमंत्री युवा कार्य व प्रशिक्षण योजना मेळावा २८ सप्टेंबर २०२४ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई येथे व ३० सप्टेंबर २०२४ रोजी शासकीय तंत्र प्रशाला अंबाजोगाई येथे सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आला आहे. यासाठी परिसरातील विविध आस्थापना उपस्थित राहणार आहेत. शैक्षणिक पात्रता धारक उमेदवारांनी मेळाव्यास उपस्थित राहून या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य यांनी केले आहे.

### जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयातील वाहन निर्लेखनासाठी निविदा सादर करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी बीड या कार्यालयातील वाहन महिंद्रा जीप क्र. चक-२३-इ-१३३८ हे वाहन निर्लेखित झालेले आहे. ज्यांना हे वाहन घ्यावयाचे आहे त्यांना कार्यालयीन वेळेत वाहन पाहवयास मिळेल. वाहन खरेदी करण्यास इच्छुक असल्यास त्यांनी त्यांच्या बंद लिफाफ्यात निविदा/दरपत्रक (जिल्हा महिला व बालविकास अधिकारीकार्यालय) बीड , बाबुराव वाघ हाईटस् दुसरा मजला नाटयगृह रोड, बीड या पत्तयावर दि. २८ सप्टेंबर २०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत. वाहन प्रत्यक्ष पाहून बंद लिफाफ्यात आपले आवश्यकतेनुसार संस्थेच्या नोंदणीचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील. वाहन विक्रीचे दरपत्रक मंजूर करणे अथवा रद्द करणे, विक्रीबाबतचे सर्व अधिकार जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय बीड यांचे असतील दि. २८ सप्टेंबरनंतर प्राप्त झालेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत. यांची संबधितांनी नोंद घ्यावी, असे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी कळविले आहे.

### राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त आरोग्य माता हॉस्पिटलमध्ये स्वच्छता शिबिर संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

दिनांक २४ सप्टेंबर २०२४ रोजी बाबुजी आव्हाड महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत ख्रिश्चन मिशनरी संचलित आरोग्य माता हॉस्पिटलमध्ये स्वच्छता शिबिर घेण्यात आले. या शिबिरामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे २०० स्वयंसेवक-स्वयंसेविका सहभागी झाले.राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त महाविद्यालयातील आरोग्य माता हॉस्पिटल स्वच्छता रॅलीचे आयोजन करण्यात आले.स्वच्छतेचा संदेश घेऊन राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आरोग्य माता हॉस्पिटलमध्ये पोहोचले व तेथे संपूर्ण परिसराची स्वच्छता करण्यात आली. हॉस्पिटलच्या वापरामध्ये आलेले प्लास्टिक कचरा, गाजर गवत निर्मूलन करण्यात आले.या स्वच्छता शिबिरामध्ये मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.ए.चौरे यांनी स्वच्छता हीच ईश्वर सेवा हा संदेश राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी घराघरात पोहोचवावा असे आवाहन करून रॅलीला हिरवा झेंडा दाखवला. या स्वच्छता शिबिराच्या आयोजनामध्ये रासेयो राष्ट्रीय कार्यक्रमाधिकारी डॉ. अरुण राख, प्रा.आनंद घोंगडे, डॉ.वैशाली आहेर,तसेच डॉ.अशोक डोळस, डॉ.अर्जुन केरकळ प्रा. ब्रह्मानंद दराडे,प्रा.राम केंद्रे,प्रा.संदीप कराड आदी उपस्थित होते.हे स्वच्छता शिबिर यशस्वी करण्यासाठी आरोग्य माता केंद्राच्या प्रमुख सिस्टर लुसिया डिसूजा आणि सिस्टर मनीषा चित्ते त्यांचे सहकार्य लाभले.

### पाणी मागून दोघांनी वृध्द महिलेला लुटले; आष्टी तालुक्यातील जामगाव येथील घटना



**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील जामगाव येथे दोन अज्ञात व्यक्तींनी एका वृध्द महिलेला पिण्यासाठी पाणी मागितले पाणी दिल्यानंतर एकट्या वृद्धेला पाहून गळ्यातील सोन्याचे मणीमंगळसूत्र हिसकावून घेऊन पळ काढला. याप्रकरणी वृद्धेच्या तक्रारीवरून पोलिसात गुन्हा दाखल. सोमवारी (दि.२३) सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास जामगाव (ता.आष्टी) दोन अनोळखी इसम आले. त्यांनी पिण्यासाठी पाणी मागितले वृध्द आशाबाई गोरख जगदाळे यांनी पाणी आणून दिले. त्या दोघांनी पाणी पिल्यानंतर आजूबाजूला कोणीही नसल्याची संधीसाधून या महिलेच्या गळ्यातील मणीमंगळसूत्र हिसकावून पळ काढला. यानंतर त्यांनी आष्टी पोलीस ठाणे गाठून आशाबाई गोरख जगदाळे यांनी फिर्याद दिली. या फिर्यादीवरून आष्टी पोलीस ठाण्यात दोन अज्ञात आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पोलीस हवालदार काळे हे तपास करीत आहेत.